# भारत–अमेरिका संबंध

**डॉ. मनिषा अनिल कचवे**
एस. एस. व्ही. पी. भाऊसाहेब, एन.एस.पाटील आर्टस् कॉलेज
ॲण्ड मुल्ला फिदा मुल्ला अली कॉमर्स कॉलेज
धुळे

***गोषवारा***
*प्रस्तुत शोधनिबंधात 2010 ते 2015–16 पर्यंत भारत–अमेरिका संबंध कसे होते याचे विवेचन केले आहे. या दोन्ही देशातील सत्तापालटण्या अगोदर व नंतर कसे संबंध आहेत. याचा अभ्यास करणे आवश्यक आहे. हे दोन लोकशाही प्रधान राष्ट्र यांची जवळ येण्याची कारणे कोणती आहेत? याचा भारताच्या परराष्ट्र धोरणावर काय परिणाम झाला? त्याची चर्चा यात करण्यात आली आहे.*

**प्रस्तावना**

जगातील सर्वात जुनी लोकशाही असलेला अमेरिका आणि जगातील सर्वात मोठी लोकशाही असलेला भारत, अशा या दोन्ही देशात शीतयुध्दात तणावपूर्ण संबंध होते. पण तुटलेले नव्हते. भारताच्या अलिप्ततावादावर अमेरिकेचे अनेक आक्षेप होते. त्यामुळे भारताचा कल हा रशियाकडेच होता. नंतर भीतयुध्दाचा भोवट झाला. दोन्ही देशातील नव्या पर्वाला सुरुवात झाली. हळूहळू परस्परातील संबंध हितसंबंधांच्या व्यापकतेमधून घनिष्ठ व्हायला लागले. अमेरिकेशी भारताचे संबंध कसे आहेत यावर भारताची आशिया खंडातील भूमिका आणि प्रभाव निर्धारित होतात.

अमेरिकेचा भारताकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलला. चीनचा काउंटर वेट म्हणून भारताला पुढे आणायला अमेरिकेने सुरुवात केली.

या दोन्ही देशांचा घनिष्ठ संबंध जागतिक राजकारणावर परिणाम करतात त्याचा या शोधनिबंधात ऊहापोह करण्यात आला आहे.

**संशोधनाची उद्दिष्टे**

1. दोन्ही देश जवळ येण्याची कारणे जाणून घेणे.
2. भारताला अमेरिकेची गरज काय हे समजून घेणे.
3. दोन्ही देशातील तणावाच्या कारणांचे विश्लेषण करणे.
4. भारताचे अमेरिकेबरोबर संबंध सुधारण्यासाठीच्या आव्हानांचा आढावा घेणे.

**संशोधनाची गृहितके**

1. भारत–अमेरिका मैत्रीसंबंध दृढ होत आहेत.
2. भारत–अमेरिका संबंधांमुळे भारताच्या परराष्ट्र धोरणात बदल झाले आहेत.
3. भारताबरोबर मैत्री वाढविण्यासाठी अमेरिकेने आपल्या धोरणात बदल केले आहेत.

आंतरराष्ट्रीय पटलावर भारताचे महत्त्व वाढायला लागले याचा परिणाम अमेरिकेचे भारताबाबतचे धोरण बदलण्यामध्ये झाले आहे.

भारत–अमेरिका संबंध सकारात्मक होण्याची कारणे व अमेरिकेला भारताची गरज कोणत्या घटकासंदर्भात ती कारणे–

**1) अमेरिका–रशियातील वाढता तणाव–**

2011 ते 2016 पर्यंतचा कालखंड पाहिला तर अनपेक्षित घटना जागतिक स्तरावर घडत होत्या. त्यातून पुन्हा एकदा शीतयुध्दकालीन परिस्थिती निर्माण होते की, असे वातावरण निर्माण झालेले होते. अमेरिका आणि रशिया यांच्यातील वाढत्या तणावामुळे नवे शीतयुध्द होण्याची शक्यता वाढू लागली होती. अमेरिका आणि युरोपीयन महासंघाने रशियावर आर्थिक निर्बंध लादले. रशियाने यांच्यापुढे न झुकता चीनशी जवळीक साधली. शीतयुध्दासारखे दोन गट तयार झाले होते. भारत तर रशियाचा मित्र राष्ट्र होताच शिवाय रशियाशी व्यापार ही मोठया प्रमाणात होता. रशियावर जर निर्बंध लादायचे असतील तर अमेरिकेला भारताची गरज भासणार आहे. यावेळी भारत आपल्या बाजूने असावा यासाठी अमेरिका प्रयत्नशील होते.

**2) इसिसशी लढण्यासाठी भारताची गरज**

अमेरिकेने इसिसच्या विरोधात पश्चिम आशियामध्ये लष्करी मोहीम सुरु केली होती. ही लष्करी मोहिम अमेरिकेला व्यापक बनवायची होती. तसेच या युध्दात अमेरिकेला भारताची गरज होती कारण भारतीय सैन्य गनिमीकावा तंत्रामध्ये पारंगत आहे. त्यामुळे भारताने भाांती सैन्य तेथे पाठवावे अशी इच्छा अमेरिकेची होती.

**3) चीनचे वर्चस्व कमी करण्यासाठी अमेरिकेला भारताची गरज**

चीनने आशिया क्षेत्रात अमेरिकेविरुध्द वातावरण निर्मिती करण्यास सुरुवात केली होती. चीनचे राष्ट्राध्यक्ष भी झिनपिंग यांच्यामते, आशिया हा आशियन लोकांसाठी आहे. अमेरिकेचा आशिया खंडातील प्रभाव कमी केला पाहिजे आणि आशियन लोकांनी आपले प्रश्न स्वतःच सोडविले पाहिजे. चीनने आशियातील राष्ट्रांना आर्थिक

मदत करायला सुरुवात केली. या पार्श्वभूमीवर चीनच्या या आशियामधील मोहिमेमध्ये भारताने भाग घेऊ नये अशी अमेरिकेची इच्छा होती. भारत चीनकडे ओढला जाईल अशी भिती अमेरिकेला वाटत होती.

**4) आशिया प्रांतात क्षेत्रातील युतीसाठी अमेरिकेला भारताची गरज**

अमेरिकेतील आर्थिक मंदी तसेच पश्चिम आशियाचे प्रश्न यात अमेरिकेला बाहेर पडता येत नव्हते त्यात दक्षिण पूर्व आशियाई राष्ट्रे चीनच्या आक्रमणवादामुळे अमेरिकेकडे मदत मागत होते. म्हणून अमेरिकेला वाटत होते चीनच्या विरोधात भारत आणि जपानची युती व्हावी. आशिया पॅसिफिक क्षेत्रातील राजकारणासाठीही अमेरिकेला भारताची गरज होती.

**5) अफगणिस्तानात भारताने काही भूमिका स्विकारावी अशी अमेरिकेची इच्छा होती**

अफगणिस्तानमधून अमेरिकेला बाहेर पडायचे आहे पण नंतरची जी परिस्थिती अफगणिस्तानमध्ये असेल त्याच्यावर भारताचे नियंत्रण असावे व आर्थिक भार भारताने उचलावा अशी अपेक्षा अमेरिकेची होती.

**6) व्यापारीसंबंध वाढवावे**

भारत मोठी बाजारपेठ आहे, त्याचा फायदा अमेरिकेला घ्यायचा आहे. म्हणजे व्यापार वाढवून नोकऱ्या निर्माण करायच्या आहे. अणूउर्जा, विमा, रिटेल मार्केटींग व शस्त्रास्त्र या क्षेत्रात अमेरिकेला भारताशी व्यापार करायचा आहे. म्हणजे आर्थिक कारणांमुळे ही अमेरिका भारताच्या जवळ येत आहे.

**7) निवडणूकीतील सहकार्य**

निवडणूकीत विजयश्री प्राप्त करण्यासाठी भारताची गरज होती कारण 30 लाख भारतीय अमेरिकेत वास्तव्यास आहेत. त्यामुळे मतदानासाठी आणि निधी उभारण्यासाठी भारतीयांची गरज अमेरिकन पक्षांना वाटत होती.

भारताला अमेरिकेच्या मदतीची गरज होती म्हणून भारताने अमेरिकेशी 10 वर्षासाठीचा संरक्षण सहकार्य करार केला. भारताला संरक्षण क्षेत्रातील तंत्रज्ञान अमेरिकेकडून मिळेल व काही कामांसाठी संयुक्त उत्पादन होईल आणि पुढे या तंत्रज्ञानाचा फायदा घेत भारत स्वतंत्रपणे उत्पादन करेल.

भारताला दहशतवादाशी मुकाबला करण्यासाठी अमेरिकेच्या मदतीची गरज आहे. समुद्रमार्गाचे संरक्षण ही भारतासाठी फार महत्वाची गोष्ट आहे कारण या मार्गानेच मोठ्या प्रमाणात तेलवाहतूक होत असते. हिंदी महासागर, प्रशांत महासागर यानंतर ही तेलवाहू जहाजे अमेरिकेकडे जातात. या मार्गात चीनचा खूप मोठा धोका निर्माण झालेला आहे. त्यामुळेच समुद्रमार्गाचे संरक्षण दोघांना संयुक्तपणे करणे गरजेचे आहे.

**अमेरिका व भारत यांच्यातील तणावाची कारणे**

1. भारत–अमेरिकेमध्ये जो नागरी अणूउर्जा करार झाला तो प्रत्यक्षात आणण्यासाठी आण्विक उत्तरदायित्वाचे विधेयक मंजूर होणे गरजेचे होते. कारण अणूउर्जेसाठी लागणारे तंत्रज्ञान आणि युरेनियम हे अमेरिकेकडे आहे, ते भारताला विकून अमेरिकेला खूप मोठ्या व्यापाराच्या संधी मिळणार होत्या पण हे विधेयक मंजूर न झाल्याने अमेरिकेचे आर्थिक नुकसान झाले.
2. विमा क्षेत्रामध्ये सुधारणा होणे अमेरिकेला अपेक्षित होते, त्या झाल्या नाही.
3. रिटेल मार्केटिंग बाबतच्या विधेयकात अपेक्षित सुधारणा न झाल्यामुळे अमेरिकेमधील वॉलमार्टसारख्या बहुराष्ट्रीय साखळी कंपन्यांना, मॉल्सना भारतामध्ये मर्यादा आल्या.
4. भारताने संरक्षण क्षेत्रामध्ये शस्त्रास्त्र विकत घेण्यासाठी जे व्यापार केले त्यामध्ये अमेरिकेला डावलून रशिया, फ्रान्स आणि इस्त्राईल या राष्ट्रांवर भर दिला त्यामुळे अमेरिकेला फार मोठा आर्थिक फटका बसला.
5. इंटेलेक्च्युअल प्रॉपर्टी राईटस् याबाबत भारतामध्ये ठोस कायदे नसल्यामुळे अमेरिकेला व्यापारी नुकसान झाले.
6. भारतात औषध व्यवसायास वाव नाही कारण तो दुर्लक्षित आहे त्यामुळे भारताबरोबर या क्षेत्रामध्ये व्यापार करण्यासंदर्भात अमेरिकेला मर्यादा येतात.
7. भारताच्या कररचनेत सुधारणा व्हावी अशी अमेरिकेची मागणी आहे कारण त्यांना व्यापार करण्यासाठी कर व्यवस्था घातक ठरते.
8. अमेरिकेच्या नॅशनल सिक्युरिटी एजन्सीने भारतीय जनता पक्षाच्या काही लोकांची हेरगिरी केल्यामुळे भारत–अमेरिका संबंध तणावपूर्ण बनले.
9. भारतीय दूतावासातील अधिकारी देवयानी खोब्रागडे यांना ज्याप्रकारची वागणूक दिली गेली त्यामुळे दोन्ही देशांचे संबंध तणावपूर्ण बनले.

**भारताचे अमेरिकेबरोबर संबंध सुधारण्यासाठीचे आव्हान**

जर भारत अमेरिका संबंध भविष्यात सुधारायचे असतील तर भारताला काही धाडसी पावले उचलावी लागतील.

1. भारत–अमेरिका मैत्री ही सामायिक युतीमध्ये (स्ट्रॅटेजिक पार्टनरशिप) परावर्तित व्हावी अशी अमेरिकेची इच्छा आहे, पण भारताची इच्छा नाही.

भारताला आपले परराष्ट्र धोरणातील स्वातंत्र्य गमवायचे नाही.

2. अमेरिकेबरोबरची युती करणे म्हणजे त्याला ज्युनियर पार्टनर किंवा कनिष्ठ भागीदार म्हणून काही काळ काम करावे लागेल. जपान किंवा इंग्लंडने असे काम केले आहे. त्यांचा विकास झाला आहे. मात्र यासाठी भारत तयार नाही.
3. चीनच्या विस्तारवादावर, चीनच्या लष्करी आधुनिकीकरणाबाबत, चीनच्या इतर देशांबरोबर सुरु असलेल्या सीमावादाबाबत भारताने उघड भूमिका घेऊन चीनवर टीका करावी, असे अमेरिकेला वाटते. पण भारत तयार नव्हते.
4. इसिस ने इराक आणि सिरियामध्ये जो धुमाकूळ घातला होता त्या विरोधात भारताने अधिकृतरित्या कोणतेही प्रतिपादन केले नाही कारण भारतात मुस्लिमांची संख्या मोठी आहे.
5. भारताने काही देशांमध्ये आपले भाांती सैन्य पाठवावे लागेल.
6. भारताने आपल्या आर्थिक उदारीकरणाच्या कार्यक्रमात लवचिकता आणणे, आण्विक उत्तरदायित्वाचे विधेयक, कररचना सुधारणा विधेयक, विमाक्षेत्र सुधारणा विधेयक, रिटेल मार्केटिंग सुधारणा विधेयक, ही विधेयके भारतीय संसदेत मंजूर होणे आवश्यक आहे. म्हणजे अमेरिका भारतात गुंतवणूक करु भाकेल.
7. भारत हा एकमेव असा देश आहे ज्याच्याशी अमेरिकेने नागरी अणू करार केला आहे. भारताने एनपीटी आणि सीटीबीटी या दोन्ही करारांवर स्वाक्षरी केलेली नसतांनाही अमेरिकेने हा करार करुन एक खूप मोठे धाडसी पाऊल उचलले आहे. अमेरिकेचे म्हणणे हे असते आम्ही भारतासाठी खूप करतो पण भारत आमच्यासाठी काहीच करत नाही.
8. अमेरिकेतील भारतीयांचा लॉबी म्हणून उपयोग करता आला असता.
9. चीनच्या विरोधात आशिया खंडामध्ये अमेरिकेच्या नेतृत्वाखाली जी युती आकाराला आली होती त्यात भारताने सहभाग घ्यायला हवा.
10. भारताला अफगणिस्तानमध्ये विकासात्मक कामांबरोबर संरक्षणात्मक कामात भूमिका बजवावी लागेल.

**निष्कर्ष**

1. अमेरिका—भारत दोन्ही देश लोकशाही शासनप्रणाली व्यवस्थेमुळे जवळ येत आहेत.
2. दहशतवाद व चीनचा धोका यामुळे अमेरिका व भारत मैत्री दृढ होत आहे.
3. भारताबरोबर संबंध प्रस्थापित करण्यासाठी अमेरिकेने तडजोड केलेली आहे.

**उपाय**

1. आंतरराष्ट्रीय पटलावर हे दोन लोकशाही राष्ट्र दहशतवाद नष्ट करण्यासाठी एकत्र आले पाहिजे.
2. भारताने अलिप्ततावाद या परराष्ट्र धोरणात बदल करणे आवश्यक आहे.
3. रिटेल मार्केटिंग, विमा यासारख्या विषयांवर भारताने कायदा संमत करणे आवश्यक आहे.

**संदर्भग्रंथ**


1. *भारताचे परराष्ट्र धोरण— डॉ. शैलेंद्र देवळाणकर, सकाळ प्रकाशन*
2. *आंतरराष्ट्रीय संबंध— डॉ. वा. भा. पाटील, प्रशांत पब्लिकेशन्स*
3. *आंतरराष्ट्रीय संबंध— डॉ. बी. डी. ताडेकर, डायमंड पब्लिकेशन्स*